नि.फौ.ख.क्र. ८६/२०१६
सरकार –वि– तानाजी जुनारे
निशाणी क्र. ४२ खाली

## आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचा कलम ३१३ अन्वये जबाब

**आरोपीचे नाव – तानाजी सुपडा जुनारे,** वय ३४ वर्ष, रा. तांदुळवाडी, ता.नांदुरा. जि.बुलडाणा.

प्र. १ – तुम्ही अभियोग पक्षाचा पुरावा ऐकला का व तो तुम्हाला समजला का ?

**उत्तर – होय.**

प्र. २ – अभियोग साक्षीदार क्र.१ श्री. गणेश सखाराम भटकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, माहे ऑगस्ट २०१५ पासुन दोन कालावधीचे पावेतो ते शेंबा बु. या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक म्हणुन कार्यरत होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, पाणीपुरवठा करण्याकरिता नळगंगा धरणावरुन पाईपलाईने गावात दोन पाण्याच्या टाक्या उभ्या करण्यात आल्या आहेत. कर्मचारी संतोष बोरकर यांनी टाकीमध्ये पाण्याचा दबाव कमी असल्याबाबत व टाकी भरत नसल्याबाबत त्यांना सांगितले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर ग्रामपंचायत कर्मचारी, पदाधिकारी व ते नळगंगा धरणापासून पाईप लाईन तपासत आले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ५ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांच्या लक्षात आले की, तुम्ही तुमच्या शेतात बागायती पिक घेतले होते व तुम्ही ग्राम पंचायतीच्या पाईप लाईनला पाईप जोडून तुमच्या विहिरीत पाणी घेतले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ६ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, खराटे व सरपंच बाईचे जेठ भिडे हे त्यांच्यासोबत होते. त्यावेळी तुम्ही शेतात हजर होता. त्यांनी तुमच्याकडे चौकशी केली असता तुम्ही सांगितले की, तुम्ही ग्रा.पं. चे पाईप लाईनला छिद्र पाडून दोन इंची पाईपने पाणी घेतलेले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ७ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही दोन ते तिन लाख लिटर पाणी चोरले असुन त्याची अंदाजे किंमत पन्नास हजार रुपये होती. तुम्ही ग्राम पंचायत चे पाईपला तुमचा पाईप जोडला असल्याचे त्यांनी स्वतः पाहिले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ८ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरची बाब त्यांनी दिनांक १०/०६/२०१६ रोजी पाहिली व दुस–या दिवशी त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांची फिर्यादीवर सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे व त्यास निशाणी क्र. १६ वर व छापिल खबरीस निशाणी क्र. १७ वर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ९ – साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, घटनेच्या दिवशी ग्राम पंचायत चे पदाधिकारी पोलीस ठाण्यात गेले होते, परंतु, त्यांनी ग्रामसेवकांना आणण्यास सांगितले होते. तो पर्यंत संध्याकाळ झाल्यामुळे त्यांनी दुस–या दिवशी तक्रार दिली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १० –साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी त्यांच्या व दोन पंचा समक्ष घटनास्थळाला भेट दिली व त्यावेळी त्यांच्यासोबत एक फोटाग्राफर असुन त्याने जागेवर शुटींग व फोटो सुध्दा काढले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ११– साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यावेळी जागेवर पंचनामा करण्या आला होता. त्यांना अभिलेखातील फोटो दाखविण्यात आले ते फोटो तेच असुन फोटोला वस्तु क्र. १ ते ६ देण्यात येते. तुमचे शेत गट क्र. ८८ मध्ये अंदाजे तिन एक्कर होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १२– अभियोग साक्षीदार क्र. २ श्रीकृष्ण वासुदेव खोंदले यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते फिर्यादीस ओळखतात. ते दुसरा पंच दिलीप खराटे यांस देखील ओळखतात. दिनांक ११/०६/२०१६ रोजी त्यांना व दिलीप यांस पोलीसांनी तुमच्या शेतात बोलाविले होते. तुम्ही ग्राम पंचायतीच्या पाईपलाईनला त्याचा पाईप जोडून पाणी घेतले होते, त्याबाबत पोलीसांना पंचनामा करायचा होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १३– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्या ठिकाणी फिर्यादी, ते, दिलीप खराटे, फोटोग्राफर वासुदेव भिडे व पोलीस हजर होते. तेथे त्यांच्यासमक्ष पाईपालाईनचे फोटो काढण्यात आले व पोलीसांनी पाईप व नळ्या जप्त केल्या, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १४– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, ग्राम पंचायतीस पाणीपुरवठा करणारी नळगंगा धरणांस जोडलेली पाईपलाईन तुमच्या शेतातून जात होती. तुम्ही त्या पाईपलाईनला शॅडल जोडून त्यास एक इंची पाईप जोडून दोन ठिकाणी पाणीपुरवठा घेतलेला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १५– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही त्या पाईपला ठिबक जोडून तुमच्या शेतातील कपाशीच्या पिकाला पाणीपुरवठा केल्याचे दिसत होते. पोलीसांनी पाईप आणि ठिबकचे पाईप जप्ती करुन त्यांच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १६– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांची पंचनाम्यावर सही असून त्यातील मजकूर खरा आहे, त्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येत आहे. पाईप व नळ्या जप्ती केल्याबाबत पोलीसांनी जागेवर पुन्हा स्वतंत्र जप्ती पंचनामा केला. सदरचा पंचनाम्यावर त्यांची सही असून त्यातील मजकूर खरा आहे, त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येत आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १७– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, ग्राम पंचायतीची पाईपलाईन पाच इंची होती. वासुदेव भिडे यांनी जागेवर फोटो काढून छायाचित्रण देखील केले होते. त्यांना अभिलेखातील फोटो दाखविण्यात आले. त्यापैकी सहा फोटोंना यापूर्वी वस्तू क्र. १ ते ६ देण्यात आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १८– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, उर्वरीत दोन

फोटोंना आज रोजी **वस्तू क्र. ७ व ८** देण्यात येत आहे. छायाचित्रीकरण करतांना ते तेथे हजर होते. छायाचित्रण झाल्यानंतर वासुदेव भिडे यांनी त्यांना ते त्याच्या मोबाईलवर दाखविले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. १९– साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमच्याकडे तांदुळवाडी शिवारात गट क्र. ८८ ही जमीन असून त्याचे क्षेत्रफळ अडीच ते तीन एकर आहे. घटनेच्या वेळी सदर शेतात कपाशीचे पीक होते. ग्राम पंचायतीचे पिण्याचे पाणी तुम्ही चोरुन वापरुन त्याचा शेतात पाणी पुरवठा केला होता. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २०– अभियोग साक्षीदार क्र. ३ अक्षय बळीराम बगाडे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सन २०१६ साली ते फोटोग्राफीचा व्यवसाय करत होते. तेव्हा तुमच्या शेतात पाईप–लाईन जोडल्याबाबत फोटोग्राफी व शुटींग करण्याकरिता त्यांना वासुदेवने बालाविले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २१– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तेथे गावाचे सरपंच, ग्रामसेवक, इतर सदस्य व पोलीस हजर होते. त्यांनी जागेवर खोदकाम करुन पाईप कनेक्शन बाहेर काढले. त्या कार्यवाहीबाबत फोटो काढुन जागेवर व्हीडीओ शुटींग केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २२– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांच्याकडे कॅनन कंपनीचा १३०० मॉडेलचा डिजीटलचा कॅमेरा होता. त्यांना सदर

कॅमेरा हाताळण्याची माहिती आहे तसेच ते त्या कॅमे–यात काढलेले फोटो तयार करु शकतात, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २३– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्या प्रकरणात त्यांच्या कॅमे–याने काढलेले फोटो त्यांनी तयार केले व ते पोलीसांकडे दिले. त्यांना अभिलेखातील सदरचे आठ फोटो दाखविण्यात आले. ते फोटो वस्तु **'अ'** ते वस्तु **'फ'** वर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २४– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फोटो काढल्याबाबत पोलीस स्टेशन मार्फत त्यांना त्याचा मोबदला देण्यात आला होता. त्याबाबत त्यांनी पोलीसांना पावती दिली होती. त्यांना आता सदरची पावती दाखविण्यात आली त्यावर त्यांची सही आहे. पावती **निशाणी क्र. ३१** वर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २५– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, जागेवर शुटींग तयार केल्याबाबत त्यांनी डीव्हीडी तयार केली होती. ती डीव्हीडी त्यांनी पोलीसांकडे दिली होती. त्यात पाईप – लाईन फोडल्यापासुन संपुर्ण कार्यवाहीची शुटींग आहे. सदर डीव्हीडीला वस्तु **'ब'** देण्यात येते. पोलीसांनी त्यांचा जबाब देखील नोंदविला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २६– साक्षीदार क्र. ३ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, ते तुम्हाला ओळखतात, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २७– अभियोग साक्षीदार क्र. ४ संगिता सुरेंद्र भिडे, यांच्या पुराव्यात असे आले

आहे की, सन २०१६ साली ते शेंबा गावात सरपंच होते. गावात पाणी पुरवठा करण्याकरिता नळगंगा धरणापासुन गावातील आर.ओ. प्लॅन्ट पावेतो ६ इंची पाईप लाईन करण्यात आली आहे. त्यांचे कर्मचारी संतोष बारकु बोरकर याच्याकडे गावात पाणी सोडण्याचे काम होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २८– साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याने सांगितले होते की, पाण्याच्या टाकीत पाणी नाही. तेव्हा त्यांनी त्यास सांगितले की, पाईप लाईनची तपासणी कर. तेव्हा पाईप लाईनची पाहणी करत करत ते आरोपीच्या शेतापर्यंत गेले. तुम्ही तुमच्या शेतात कपाशीचे पिक घेतले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. २९– साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, आमच्या पाईप लाईनला होल करुन त्याने त्याच्या शेतात पाणी पुरवठा केला होता. त्याने प्रत्येकी दोन इंचाचे दोन कनेक्शन घेतले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३०– साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, गावाच्या पाईप लाईनला होल करुन तुम्ही तुमच्या शेतात पाणी पुरवठा केला होता. तुम्ही प्रत्येकी दोन इंचाचे दोन कनेक्शन घेतले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३१– साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तेव्हा तुम्ही तुमच्या घरी होता. तेव्हा त्यांनी तुम्हास शेतात बोलावुन घेतले व चौकशी केली असता तुम्ही चुक झाल्याचे मान्य केले. पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३२– अभियोग साक्षीदार क्र. ५ श्री. रामदास पुरुषोत्तम वाढे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ११/०६/२०१६ रोजी ते बोराखेडी पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. त्या दिवशी त्यांच्याकडे गुन्हा क्र. ११२/२०१६ चा तपास देण्यात आला होता. गुन्हा दिनांक १०/०६/२०१६ रोजी निष्पन्न झाला होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३३– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही पाणी चोरल्याबाबत फिर्याद देण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी निशाणी क्र. २० प्रमाणे घटनास्थळ पंचनामा केला. तेव्हा दोन पंच, ग्राम पंचायत सदस्य, मजुर व फोटोग्राफर त्यांच्यासोबत होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३४– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, पंचनाम्याच्या वेळेस फोटो काढण्यात आले होते तसेच त्या प्रक्रियेचे चलचित्रण साक्षीदार क्र. ३ याने केले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३५– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, प्रक्रियेनंतर साक्षीदार क्रमांक ३ याने त्यांना घटनास्थळाचे फोटो व चलचित्रणबाबत सि.डी. दिली होती. वस्तु **'अ'** ते वस्तु **'फ'** वरिल फोटो तेच असुन वस्तु ब वरिल डि.व्ही.डी. तिच आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३६– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरचे फोटो आणि डि.व्ही.डी. संदर्भात त्यांनी पुरावा कायदा कलम ६५ ब नुसार

प्रमाणपत्र हजर करण्यात तयार आहे. घटनास्थळ हे तांदुळवाडी शिवारात गट क्रमांक ८८ मध्ये होते. ती जमीन तुमचे वडील सुपडा जुनारे यांच्या मालकीची होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३७– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, जागेवर असे दिसुन आले होते की, ग्राम पंचायतीने सहा इंची पाईप लाईनला तुम्ही तुमच्या शेतात प्रत्येकी पाऊन इंचीचे दोन पाईप लावुन तुमच्या शेतात पिकांना पाणी देण्याची व्यवस्था केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३८– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही सदरचे पाणी ठिबकद्वारे शेतात देत होता. तुम्ही पाऊण इंचीचे पाईप सॅडलच्या सहाय्याने जोडले होते. तपासात त्यांनी सदरचे सॅडल, पाईप व ठिबकच्या नळ्या जप्त केल्या होत्या. त्याबाबत त्यांनी जप्ती पंचनामा केला व तो निशाणी क्र. २१ वर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ३९– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरच्या जमीनीबाबत त्यांनी सुपडा जुनारे यांच्या नावाचा ७/१२ उतारा प्राप्त केला. तो **निशाणी क्र. ३५** वर आहे. तपासात असे निष्पन्न झाले की, तुम्ही ग्राम पंचायतीच्या पिण्याचे पाणी चोरले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४०– साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी तुम्हाला अटक करुन तपास पूर्ण केला व तुमच्याविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी तुमच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४१– अभियोग साक्षीदार क्र. ६ वासुदेव बाबुराव भिडे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, संगिता भिडे त्यांच्या लहान भावाची पत्नी आहे व ती शेंबा गावाची सन २०१६ मध्ये सरपंच होती. त्योवळी गणेश भटकर ग्रामसेवक / सचिव होते. गावामध्ये पाण्यासाठी नळगंगा धरणातुन पाईप लाईन केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४२– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, डिडोळा, पिंप्री, शेंबा खुर्द आणि तांदुळवाडी च्या शिवारातुन पाण्याची पाईप लाईन येत होती. त्यांच्या गावात पाणी कमी प्रमाणात येते असल्यामुळे गावातील सरपंच, ते स्वतः, ग्रामसेवक व गावातील लोक मिळुन ते नळगंगा धरणाकडे गेले होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४३– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, ते तांदुळवाडी येथिल तुमच्या शेतात पोहोचले असता त्यांना तेथे एक पाण्याचा झरा दिसला. तुमच्या शेतात कापासाचे पिक होते व त्याला ठिबकच्या साह्याने पाणी देणे सुरु होते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४४– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही तुमच्या शेतात हजर होता. त्यांनी तुम्हाला पाण्याबदल विचारले असता तुम्ही स्वतःहुन सांगितले की, तुमच्या गावातील पाण्याच्या पाईप लाईनला पाऊन इंचीचे दोन कनेक्शन लावुन पाणी घेतले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४५– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याबद्दल तुम्ही त्यांना क्षमा मागितली. फिर्यादीनंतर ते, श्रीकृष्ण खुंदाले, दिलीप खराडे

आणि पोलीसांसोबत घटनास्थळी गेलो. तेथे घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यांच्या समक्ष पाईप लाईन उकरुन काढुन जप्त केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४६– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, घटनास्थळी फोटोग्राफरने फोटो काढले. त्यांना अर्टीकल १ ते ८ वरील फोटो दाखविले. त्यात ते स्वतः दिसत आहे. घटनास्थळावरील शेताचा गट क्र. ८८ आहे व शेताचा मालक तुमचे वडील होते, ते शेत तुम्ही वहिती करीत होता, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४७– साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तांदुळवाडी ते शेंबा मधील अंतर एक किलोमिटर आहे. पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी केली होती, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

**उत्तर – हे खोटे आहे.**

प्र. ४८ –वरील साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देत आहे ?

**उत्तर – खोटी साक्ष देत आहे.**

प्र. ४९ –तुम्हाला शपथेवर साक्ष द्यायची आहे का ?

**उत्तर – नाही.**

प्र. ५० –तुम्हाला बचावासाठी साक्षीदार तपासावयाचे आहे का ?

**उत्तर – नाही.**

प्र. ५१ –तुम्हाला या खटल्याबाबत काही सांगावयाचे आहे का ?

**उत्तर – खोटी केस केली आहे.**

आरोपीची सही — समक्ष,

सही/– — सही/–

---

**(आर.ए. मिसाळ)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा

**नि.फौ.ख.क्र. ८६/२०१६** 
**सरकार -वि- तानाजी जुनारे**
**निशाणी क्र. ४२ खाली**

**प्रमाणपत्र**

''प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा उपरोक्त जबाब माझे समक्ष व प्रत्यक्ष सुनावणीत नोंदविण्यात आला असून त्यातील मजकूर आरोपीने कथन केल्याप्रमाणे पूर्ण व खरा आहे."

सही/-

नांदुरा. **(आर.ए. मिसाळ)**
दिनांक – ०३/०८/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा

- - - - -